Lokneta News - लोकनेता न्यूज

महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड लोकनेता

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●




शुक्रवार २८ ऑगस्ट २०२६ | RNI-MAHMAR/2023/89402 | Email dainiklokneta.in@gmail.com | वर्ष : ४ | अंक : ११ | किंमत २ रुपये | 7499615933

# तुकाराम मुंढेंच्या रडारवर राज्यातील अंगणवाड्या, थेट आदेशाने टेन्शन वाढलं

## आम्ही कोणालाही सोडत नाही शालेय पोषण आहार रडारवर

**दैनिक अजिंठा लोकप्रतिबिंब**

**आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची धडाकेबाज मोहीम सुरूच आहे. आता अंगणवाड्या त्यांच्या रडारवर आल्या आहेत. अन्न आणि औषध प्रशासनाने राज्यातील अंगणवाड्यांमधील पोषण आहार, शालेय पोषण आहार, मिड-डे मिलकडे मोर्चा वळवला आहे. महाराष्ट्रभर अंगणवाडी आणि शालेय आहार व्यवस्थेच्या तपासणीचे आदेश देण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांना निकृष्टदर्जाचे जेवण देण्यात येत असल्याचे समोर आले होते. भुंगे लागलेले कडधान्य, खिचडीत आळ्या आणि अस्वच्छतेच्या घटना समोर आल्या होत्या. या नवीन आदेशामुळे शालेय पोषण आहारात मापात पाप करणाऱ्यांचे धाबे दणाणार आहे.**

सेंट्रल किचन्समधून अंगणवाडी आणि शाळांना पुरवण्यात येणाऱ्या अन्नाचे नमुने घेतले. तपासणीनंतर एका सेंट्रल किचनचा परवाना निलंबित करण्यात आला. महाराष्ट्रभर अंगणवाडी आणि शालेय आहार व्यवस्थेच्या तपासणीचे आदेश देण्यात आले आहेत. शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये वर्षातून किमान दोन वेळा तपासणी करण्यात आली.

### आम्ही कोणालाही सोडत नाही

एका मुलाखतीदरम्यान आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सध्याच्या कारवाईबाबत जी टीका होते त्याला उत्तर दिले आहे. आम्ही कोणालाही सोडत नाही. FDAकडून निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने कारवाईचा दावा त्यांनी केला. जवळपास दररोज तपासणी आणि कारवाईची माहिती माध्यमांना दिली जाते. कारवाईसोबत फोटो आणि व्हिडिओही प्रसिद्ध केले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. निष्पक्ष आणि पारदर्शक कारवाई सुरूच राहणार असल्याचे ते म्हणाले. सरकारी असो किंवा खासगी, FDAच्या कारवाईत कोणताही भेदभाव करण्यात येत नसल्याचे मुंढेंनी स्पष्ट केले.



### शालेय पोषण आहार रडारवर

आमच्या दृष्टीने सरकारी किंवा खासगी अशी वेगळी कॅटेगरी नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. FBO म्हणजे Food Business Operator असे आहे. नियम सर्वांसाठी समान असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. अंगणवाडी आणि मिड-डे मीलच्या व्यवस्थेवरही FDAचं लक्ष असल्याचे ते म्हणाले. अंगणवाडी, शाळांचे मिड-डे मील आणि सेंट्रल किचन्सचा तपासणीत समावेश आहे. मुंबईत गेल्या आठवड्यात ८ ते १० सेंट्रल किचन्सची तपासणी करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

# बदलापूरमध्ये शिवसेनेला मोठा धक्का; सुदाम घुगे यांचा भाजपमध्ये प्रवेश

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बदलापूर, प्रतिनिधी :** बदलापूरच्या राजकीय वर्तुळात मोठी राजकीय घडामोड घडली असून शिवसेनेला धक्का बसला आहे. शिवसेनेचे नेते सुदाम घुगे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला.

सुदाम घुगे यांच्या भाजप प्रवेशामुळे बदलापूर परिसरातील राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्थानिक पातळीवर पक्षसंघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने भाजपसाठी हा प्रवेश महत्त्वाचा मानला जात आहे.



**आमदार किसन कथोरे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश; स्थानिक राजकारणात चर्चेला उधाण**

यावेळी आमदार किसन कथोरे यांनी सुदाम घुगे यांचे भाजपमध्ये स्वागत केले. पक्षाच्या विचारधारेवर विश्वास ठेवून कार्यकर्त्यांनी आगामी काळात संघटन मजबूत करण्यासाठी सक्रियपणे काम करावे, असे आवाहन करण्यात आले.

सुदाम घुगे यांच्यासोबत त्यांच्या समर्थकांचीही भाजपशी जवळीक वाढण्याची शक्यता असल्याने



बदलापूरच्या राजकारणात या पक्षप्रवेशाची चर्चा रंगली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर या घडामोडीकडे विशेष महत्त्वाने पाहिले जात आहे.

दरम्यान, घुगे यांच्या भाजप प्रवेशामुळे शिवसेनेच्या स्थानिक संघटनेवर याचा किती परिणाम होतो आणि भाजपला याचा आगामी निवडणुकांमध्ये किती फायदा मिळतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# गोकुंदा रेल्वे गेटवर 'चेन पुलिंग'चा उपद्रव



लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट तालुका प्रतिनिधि शेख़ शौकत**

नांदेड-आदिलाबाद रेल्वे मार्गावर धावणाऱ्या नांदेड-आदिलाबाद इंटरसिटी तसेच पूर्णा-आदिलाबाद पॅसेंजरमध्ये बेजबाबदार प्रवाशांकडून साखळी (चेन) ओढण्याचे प्रकार वाढले आहेत. या प्रकाराकडे रेल्वे सुरक्षा बल आणि लोहमार्ग पोलिस दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. गोकुंदा रेल्वे गेट परिसरात गाडी थांबविल्याने रेल्वे गेट बंद राहते आणि दोन्ही बाजूंच्या रस्त्यांवर वाहनांची मोठी कोंडी होते. त्यामुळे रेल्वे प्रवाशांसोबतच वाहनचालकांनाही नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. हा प्रकार जवळपास रोजच घडत असल्याने नोकरदार, विद्यार्थी आणि नियमित प्रवास करणारे नागरिक त्रस्त झाले आहेत. प्रवाशांच्या म्हणण्यानुसार चेन पुलिंगमुळे गाडीला अनावश्यक विलंब होतो. परिणामी किनवट रेल्वे स्थानकावर उतरणाऱ्या प्रवाशांचा वेळ वाया जात असून रेल्वे विभागाने लक्ष देणे गरजेचे आहे.

# भगवंत विद्यालय हाडोंग्री येथे माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भूम/रविंद्र लोमटे**

त्रिमूर्ती शिक्षण प्रसारक मंडळ आयोजित भगवंत विद्यालय, हाडोंग्री ता. भूम येथे माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यालयाचा नावलौकिक वाढविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. उदय प्रदीप तळेकर याची IIIT भोपाळ येथे अभियांत्रिकी शिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल, तर तेजस प्रमोद सुरवसे याने CET परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून पुणे येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळवल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास बाळासाहेब पाटील हाडोंग्रीकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष धाराशिव, त्रिमूर्ती शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा. शांतलिंग घोंगडे, सुखदेव पालकर, माजी मुख्याध्यापक अनिल तळेकर, मुख्याध्यापक सुनिल डोके, प्रमोद सुरवसे, प्रदीप तळेकर, उपसरपंच रविंद्र लोमटे, भीमराव रामगुडवे, उद्धव रामगुडवे, विपुल तळेकर, अमोल जगदाळे यांच्यासह विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत यश संपादन करून आपल्या गावाचे व विद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.



## ऊस पिकावरील पायरीला रोगाच्या प्रादुर्भावाची पाहणी व शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
संतोष शिदे,काष्टी)

श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथे ऊस पिकावर पायरीला रोगाचा प्रादुर्भाव झाल्याच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रगतशील शेतकरी श्री. वैभव विवेकानंद फडणीस यांच्या ऊस पिकाची पाहणी केली.

यावेळी तालुका कृषी अधिकारी श्रीमती क्रांती चौधरी, मंडळ कृषी अधिकारी श्रीमती शीतल आरू, उपकृषी अधिकारी श्री. उगले साहेब, सहाय्यक कृषी अधिकारी श्री. किरण घोडके तसेच सहकार महर्षी काष्टी सोसायटीचे मार्गदर्शक मा. श्री. कैलास (तात्या) पाचपुते उपस्थित होते.

ऊस पिकावरील पायरीला रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी रोगप्रतिबंधक फवारणी, योग्य औषधांचा वापर व आवश्यक कृषी उपाययोजना याबाबत तालुका कृषी अधिकारी श्रीमती क्रांती चौधरी व मंडळ कृषी अधिकारी श्रीमती शीतल आरू यांनी शेतकरी बांधवांना सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी कृषीतज्ज्ञ श्री. उगले साहेब यांनी प्रास्ताविक केले. सहाय्यक कृषी अधिकारी श्री. किरण घोडके यांनी सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभार मानले.

**शेतकऱ्यांच्या हितासाठी सहकार महर्षी काष्टी सोसायटी व कृषी विभागाचा पुढाकार!**

## नांदेडमध्ये 30 ऑगस्टला 'व्हॉईस ऑफ मीडिया'चा मराठवाडास्तरीय केडर कॅम्प

### पत्रकारितेची विश्वासार्हता, एआयचे आव्हान आणि संघटनात्मक बांधणीवर मंथन; मराठवाड्यातील पत्रकारांचा मोठा सहभाग अपेक्षित

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
संजय यलमवाड
मुखेड : प्रतिनिधी

पत्रकारितेच्या बदलत्या स्वरूपात पत्रकारांची संघटनात्मक बांधणी अधिक सक्षम करणे, पत्रकारितेची विश्वासार्हता टिकविणे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय तंत्रज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पत्रकारांना सज्ज करणे, या उद्देशाने 'व्हॉईस ऑफ मीडिया' (व्ही.ओ.एम.) इंटरनॅशनल फोरम महाराष्ट्राच्या वतीने रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी नांदेड येथे मराठवाडास्तरीय एकदिवसीय केडर कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. सांगवी येथील आनंद सागर मंगल कार्यालयात सकाळी ९ वाजता कॅम्पला प्रारंभ होणार असून मराठवाड्यातील पत्रकार, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, विविध पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

या केडर कॅम्पचे उद्घाटन 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक तथा आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांच्या हस्ते होणार आहे. लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून 'व्हॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम'चे भारतातील राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हस्के अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

आंतरराष्ट्रीय सचिव दिव्या भोसले, राष्ट्रीय कार्यवाहक शंतनू डोईफोडे, राष्ट्रीय कार्याध्यक्ष दिगंबर महाले, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया, विभागीय प्रदेशाध्यक्ष अजितदादा कुंकुलोळ व नरेंद्र देशमुख यांच्यासह संघटनेचे राष्ट्रीय, प्रदेशीय आणि विभागीय पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

विश्वासार्ह पत्रकारितेवर विशेष मार्गदर्शन सकाळी १०.३० ते दुपारी १२.३० या वेळेत 'पत्रकारिता : विश्वासार्हता आणि विश्वासाचे आव्हान' या विषयावर न्यूज १८ मराठीचे सहयोगी संपादक विलास बडे मार्गदर्शन करणार आहेत. डिजिटल युगात बातमी सर्वप्रथम देण्याच्या स्पर्धेत अचूकता, संतुलन आणि विश्वासार्हता कशी जपावी, पत्रकारिता आणि माध्यमांवरील जनतेचा विश्वास कसा टिकवावा, यावर या सत्रात सविस्तर मंथन होणार आहे.

एआय आणि पत्रकारितेच्या भवितव्यावर चर्चादुपारी २ ते ३.३० या वेळेत 'एआय तंत्रज्ञान आणि पत्रकारितेतील आव्हाने' या विषयावर दिल्ली येथील गगनकुमार महोत्रा व सारिका महोत्रा मार्गदर्शन करणार आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बातम्यांची निर्मिती, माहितीचे विश्लेषण आणि डिजिटल कंटेंटमध्ये मोठे बदल होत असून, एआयचा पत्रकारितेच्या नैतिक मूल्यांचे भान ठेवून जबाबदारीने वापर कसा करावा, यावर या सत्रात मार्गदर्शन केले जाणार आहे.

महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया यांनी सांगितले की, पत्रकार संघटना ही केवळ पदाधिकारी आणि सदस्यांची रचना न राहता पत्रकारांच्या ज्ञानवृद्धी, कौशल्यविकास आणि हक्कांच्या संरक्षणाचे प्रभावी व्यासपीठ बनणे आवश्यक आहे. बदलत्या तंत्रज्ञानाची माहिती आणि पत्रकारितेतील नव्या प्रवाहांची जाण निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मराठवाडा अध्यक्ष डॉ. गणेश एम. जोशी यांनी सांगितले की, मराठवाड्यात 'व्हॉईस ऑफ मीडिया'ची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी हा केडर कॅम्प अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. डिजिटल माध्यमे, सोशल मीडिया, मोबाईल पत्रकारिता आणि एआयमुळे पत्रकारितेचे विश्व झपाट्याने बदलत असून, या बदलात पत्रकारांनी आपली विश्वासार्हता, सामाजिक बांधिलकी आणि व्यावसायिक मूल्ये जपली पाहिजेत, असे त्यांनी नमूद केले.या कॅम्पच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. गणेश एम. जोशी, विशाल माने, ऋषिकेश कोंडेकर, प्रसाद आर्वीकर, बाळासाहेब पांडे, सुनील जोशी, रामराव भालेराव, तुकाराम सावंत, अनिल धमने पाटील, अशोक कांकाडीकर, रवींद्र कुलकर्णी, सूर्यकुमार यज्ञावार, संगमेश्वर बाचे, विजय आमले, मनोज बुढले, याहिया खान, शिवाजी राजूरकर, सुरेश आंबटवार, सिद्धार्थ तलवारे, नागेश कल्याण, शरद काटकर, डॉ. प्रविणकुमार सेलूकर, प्रा. राज गायकवाड, प्रा. भगवान सूर्यवंशी, दिगंबर शिंदे, किशोर वाघद्रीकर, ईशान खान, विठ्ठल पवार आणि भरतचंद्र सूर्यवंशी यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते सक्रियपणे नियोजन करत आहेत.मराठवाड्यातील पत्रकारांमध्ये परस्पर संवाद वाढविणे, पत्रकारांच्या समस्या समजून घेणे, संघटनेचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचविणे आणि आगामी काळातील संघटनात्मक कामाची दिशा निश्चित करणे, हा या केडर कॅम्पचा प्रमुख उद्देश आहे.

मराठवाड्यातील सर्व पत्रकार, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, विविध पदाधिकारी, सदस्य आणि पत्रकारहित चिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक केडर कॅम्पचा लाभ घ्यावा, असे आवाहन 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## विलास आगळे यांची भाजपा सोयगाव तालुका उपाध्यक्षपदी निवड

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**फर्दापूर/दिपक बलांडे**

भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक विस्ताराला बळ देत विलास विठ्ठल आगळे (पिंटू) यांची भाजपा सोयगाव तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. फर्दापूर येथील भाजपा कार्यालयात आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

प्रदेश सरचिटणीस तथा मा. आ. सुनीलजी राणे साहेब, भाजपा प्रदेशाध्यक्ष अल्पसंख्यांक मोर्चा इद्रीस मुलतानी, सिल्लोड-सोयगाव विधानसभा प्रमुख सुरेश बनकर तसेच किरण पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विलास आगळे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.




यावेळी मान्यवरांनी विलास आगळे यांच्या संघटनात्मक कार्याचा गौरव करत त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडून पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्य करावे, अशा शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास सभापती उत्तम चव्हाण, जयप्रकाश चव्हाण, समाधान बावस्कर, शेख निसार, गणेश कापसे, सुरज पवार, राजू रेकनोद, कृष्णा शिरसाट, योगेश शिंदे, अज्जू सरपंच, शेख शफिक, सिताराम जाधव, भगवान जाधव, समीर तडवी, माजीत तडवी यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, विलास आगळे यांच्या निवडीबद्दल माजी मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट, तालुकाध्यक्ष संजय पाटील, ज्ञानेश्वर मोठे, पुष्पाताई काळे, माहीम मुलतानी आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विलास आगळे यांच्या निवडीमुळे सोयगाव तालुक्यात भाजपा संघटनेला अधिक बळ मिळणार असून, आगामी काळात पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी ते सक्रियपणे योगदान देतील, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात आला.

# घरकुल न बांधताच उचलले बिल?; निधी वितरणावर गंभीर प्रश्नचिन्ह.......

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**जीवन जाधव.औसा** गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना हक्काचे घर मिळावे, या उद्देशाने शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनेत गैरप्रकार झाल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थ करत असल्याच समोर आला आहे. संबंधित लाभार्थ्यांच्या घरकुलाचे बांधकाम प्रत्यक्षात पूर्ण झालेले नसताना किंवा काही ठिकाणी बांधकाम सुरूही झालेले नसताना शासकीय निधीचे बिल उचलण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना शासनाकडून टप्प्याटप्प्याने निधी उपलब्ध करून दिला जातो. मात्र, प्रत्यक्ष बांधकामाची पाहणी, कामाची प्रगती आणि शासनाच्या निकषांची पूर्तता झाल्यानंतरच पुढील निधी देणे अपेक्षित असते. असे असताना घरकुलाचे बांधकाम न करता अथवा अपूर्ण असतानाच निधी वितरित झाला असेल, तर हा प्रकार गंभीर असून त्याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. घरकुल बांधकाम पाहणी न करताच निधी मंजूर? आहे त्या घरावर घरकुल दाखवून अनेक गावात



बिले उचलण्याचा प्रकार झाला असून ज्यांना पक्के घरी आहेत त्यांनाच घरकुल मंजूर करून लाभ दिल्याचा ग्रामीण भागात सर्रास बोललं जात आहे. ज्यांना घरकुलची गरज आहे त्यांना लाभापासून वंचित ठेवायचं व जे आधीच पक्क्या घरात आहेत त्यांना लाभ देण्याचाही प्रकार घडल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. अनेक घरकुलाचे काम प्रत्यक्षात झाले आहे की नाही, बांधकाम कोणत्या टप्प्यावर आहे, लाभार्थ्याने शासनाच्या अटींची पूर्तता केली आहे का, याची संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली का, असे अनेक प्रश्न या प्रकरणामुळे उपस्थित झाले आहेत. फोटो, जिओटॅगिंग, बांधकामाची प्रत्यक्ष स्थिती आणि निधी वितरणाची नोंद यांची तपासणी केल्यास या प्रकरणातील वस्तुस्थिती समोर येऊ शकते. त्यामुळे संबंधित विभागाने कागदोपत्री नोंदींबरोबरच प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी करावी, अशी मागणी होत आहे. लाभार्थी मात्र घराच्या प्रतीक्षेत शासनाचा निधी मंजूर होऊनही प्रत्यक्षात घर उभे राहिले नसेल, तर गरजू लाभार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. अनेक कुटुंबे आजही कच्च्या घरात किंवा मोडकळीस आलेल्या घरात राहण्यास मजबूर असताना, घरकुलाच्या नावावर निधी वितरित होऊनही बांधकाम झाले नसेल तर हा प्रकार निश्चितच चिंताजनक आहे. निधीचा हिशोब जनतेसमोर आणण्याची मागणी घरकुल योजनेतील लाभार्थी यादी, मंजूर रक्कम, आतापर्यंत वितरित झालेला निधी, बांधकामाची सद्यस्थिती आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या पाहणीच्या नोंदी सार्वजनिक करण्यात याव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. तसेच, ज्या घरकुलांचे बांधकाम कागदोपत्री पूर्ण दाखविण्यात आले आहे, त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून खरोखर बांधकाम झाले आहे की केवळ कागदोपत्री पूर्तता दाखविण्यात आली आहे, याची तपासणी करावी. चौकशी होऊन दोषींवर कारवाईची मागणी घरकुल न बांधताच बिल उचलण्यात आल्याचे आरोप खरे ठरल्यास, शासकीय निधीचा गैरवापर करणाऱ्या संबंधित व्यक्ती अथवा अधिकाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच चुकीच्या पद्धतीने वितरित झालेल्या निधीची वसुली करून तो शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात यावा, अशी मागणी होत आहे. दरम्यान, या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी कोण आहे, निधी कोणाच्या माध्यमातून वितरित झाला आणि प्रत्यक्ष पाहणी न करता बिल कसे मंजूर झाले, याचा तपशील जनतेसमोर येणे आवश्यक आहे. गरिबांच्या घरासाठी आलेला शासकीय निधी कागदोपत्रीच खर्च होऊ नये, यासाठी प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन चौकशी करावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

# शा.व्य.समितीच्या अध्यक्षपदी बाबासाहेब बढे; तर उपाध्यक्षपदी शिवराम थोरे यांची निवड

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**पाचोड | त्रिसिंग जायभाये**

केकत जळगाव : येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीची निवड मंगळवारी (दि. २५) पालक व शिक्षकांच्या उपस्थितीत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी समितीच्या अध्यक्षपदी बाबासाहेब विक्रम बढे, तर उपाध्यक्षपदी शिवराम महादेव थोरे यांची निवड करण्यात आली.

**जिल्हा परिषद शाळेची स्थिती सुधारण्यासाठी सर्वतोपरी योगदान देणार**

समितीच्या सदस्यपदी सतीश बाबुराव गोरे, भाऊसाहेब महादेव नागरे, अण्णासाहेब भाऊसाहेब सोहळे , मंगल सुभाष जाधव, मनीषा बाबासाहेब मगर, निशा अरुण गवळी, यमुना अंबादास होरशीळ , जया गणेश थोरे व जयश्री पांडुरंग बढे यांची निवड झाली. यावेळी मुख्याध्यापक रायभान गायकवाड, माजी सरपंच भीमराव थोरे, पोलीस पाटील रामेश्वर थोरे, राहुल बढे, बाळासाहेब बढे, लहू थोरे यांच्यासह पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांचे उपस्थितांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



*अध्यक्ष बाबासाहेब बढे यांनी प्रतिक्रिया देताना शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावणे, विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविणे तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. उपाध्यक्ष शिवराम थोरे यांनी शाळेत सीसीटीव्ही बसविणे, विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तसेच स्वच्छतागृहाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याचे सांगितले.*

## महेंद्रशेठ घरत यांच्या मोठ्या मनाचा दिलदारपणा! नितांत सुंदर व्हिएतनामचे 35 जणांना घडवले पर्यटन!

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**उरण विठ्ठल ममताबादे**

आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा सामाजिक कार्यकर्ते महेंद्रशेठ घरत यांचे अनोखे दातृत्व सर्वपरिचित आहे. दुसऱ्यांची स्वप्नं पूर्ण करण्याचा जणू त्यांनी विडाच उचलला आहे. ज्यांनी केवळ विमान हा शब्द ऐकला आहे, अशा अनेकांना त्यांनी आजपर्यंत विमान प्रवास घडवला आहे. महेंद्रशेठ घरत यांच्या मोठ्या मनाच्या दिलदारपणामुळेच हायस्कूल आणि महाविद्यालयीन जीवनात लाभलेल्या सवंगड्यांसह त्यांनी चक्क ३५ जणांना १७ ते २५ ऑगस्ट असे आठ दिवस नितांतसुंदर अशा व्हिएतनामचे पर्यटन घडवले. परदेश प्रवास स्वप्नातही न पाहिलेल्यांना महेंद्रशेठ घरत यांनी व्हिएतनामची सफर घडवली. त्यांचे परदेश प्रवासाचे स्वप्न पूर्ण केले. त्यामुळे चाकोरीबद्ध आयुष्य जगलेल्या सवंगड्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.

ज्यांनी पासपोर्ट शब्द ऐकला होता, पण पासपोर्ट काढला नव्हता, त्यांनीही आठ दिवसांच्या पर्यटनात व्हिएतनामची राजधानी हनोई, त्यानंतर दा नांग, बाणा



हिल, फु कॉक, हो ची मिन्ह शहर आणि मुंबई असा पाच वेळा विमान प्रवास केला आणि फाईव्हस्टार आणि थ्री स्टार हॉटेलमध्ये व्हिएतनाममध्ये राहाण्याची संधी दिली. त्यामुळे अशा सहकाऱ्यांना आकाश ठेंगणे झाले होते. क्रूझ सफर, तेथे जागोजागी असणारी बेटे, बाणा हिल येथे केबल कारमधून प्रवास आणि ते विहंगम दृश्य, दोन्ही हातावर साकारलेला पूल, तेथील उंचच उंच डोंगर रांगांतून जाणारी केबल कार, अनेक बेटांना जोडणारी जगातील सर्वाधिक लांबीची केबल कार, दा ची मिन्ह हे सुसज्ज शहर आणि व्हिएतनाम-अमेरिकादरम्यानच्या युद्धाची अंगावर काटा आणणारी दृश्य असणारे संग्रहालय आदींचे दर्शन एम. जी. ग्रुपच्या सहकाऱ्यांना महेंद्रशेठ घरत यांनी घडवले. त्यामुळे एम. जी. ग्रुपचे सहकारी भारावले आहेत.

यावेळी एम. जी. ग्रुपच्या सहकाऱ्यांना भावना अनावर झाल्या होत्या. महेंद्रशेठ घरत यांच्यामुळेच आम्ही पहिल्यांदा विमानात बसलो. एवढेच नव्हे तर परदेशात जाऊ शकलो. त्यांनी प्रवासात जो आनंद दिला त्याला तोड नाही. त्यांनी स्वतःपेक्षा आमचीच काळजी व्हिएतनाम प्रवासात घेतली. उत्तम नियोजन आणि शिस्तप्रिय व्यवस्थापनाने प्रवासाचा आनंद द्विगुणित केला, अशा भावना पहिल्यांदाच परदेश प्रवास केलेल्या सवगंड्यांनी व्यक्त केल्या. परदेशात ३५ जणांना सांभाळणे आणि सांभाळून घेणे सोपे काम नव्हते, पण महेंद्रशेठ घरत यांनी ते लीलया पार पाडले. विशेष म्हणजे व्हिएतनाम पर्यटनासाठी असलेल्या सहकाऱ्यांच्या काही नातेवाईकांचे निधन झाले, काहींच्या घरी अडीअडचणी निर्माण झाल्या. कुणी गंभीर आजारी पडले, मात्र व्हिएतनाम प्रवासात महेंद्रशेठ घरत यांनी ज्यांच्या कुटुंबात दुःखद घटना घडली आहे, त्यांना मोलाचा आधार दिला. श्रद्धांजली वाहिली. तसेच गंभीर आजारी असणाऱ्यांवर व्यवस्थित आणि वेळेवर उपचार होतील, याची काळजी महेंद्रशेठ घरत यांनी व्हिएतनाममधूनही घेतली. त्यामुळे मोठ्या मनाचा, दिलदार आणि दुसऱ्याला आनंद देण्याची वृत्ती, समोरच्याच्या चेहऱ्यावरील भावना वाचणारे महेंद्रशेठ घरत, हे सद्यपरिस्थितीत एकमेव नेते असल्याच्या भावनाही व्हिएतनाम पर्यटनातील सवंगड्यांनी व्यक्त केल्या.

## आरक्षणाचा लाभ मातंग समाजाला मिळाला पाहिजे,सौ.पूनमताई पवार



नायगाव प्रतिनिधी
**लोकनेता न्यूज नेटवर्क**

सवलती आणि विकासापासून गेल्या अनेक शतकाहून अधिक मातंग समाज हा दुर्लक्षित वंचित राहिलेला आहे याबाबत आमदार राजेश पवार यांनी तीन वेळा समाजाच्या या प्रश्नासाठी विधानसभेत मागणी मांडली आहे तेव्हा खऱ्या अर्थाने आरक्षणाचा लाभ हा मातंग समाजाला मिळाला पाहिजे असे प्रखड मत नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालिका सौ पूनम ताई पवार यांनी देगाव येथे व्यक्त केले.

तालुक्यातील मौजे देगाव येथे सत्यशोधक डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ जयंती निमित्त आमदार राजेश पवार यांच्या सौभाग्यवती पुनमताई पवार यासह प्राचार्य लक्ष्मण कोंडावार, रणजीत पो.पा. मोरे,रावसाहेब पाटील मोरे, गणपत रेडी, रावसाहेब पवार, पी एस वाघमारे, राहुल गायकवाड,माजी पीएसआय शेषराव रोडे यांच्या हस्ते डॉक्टर अण्णाभाऊ साठे यासह सर्वच महापुरुषांच्या प्रतिमेचे मान्यवरांनी पूजन करून अभिवादन केले.

तर क्रांती लाल ध्वजाचे ध्वजारोहण सौ.पुनमताई पवार यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पी एस वाघमारे हे होते तर प्रस्ताविक मध्ये माजी पीएसआय शेषराव रोडे यांनी डीजे विना जयंती साजरी करावी अन्यथा भविष्यात समाजाला गंभीर परिणाम भोगावे लागतील असे सांगत आमदार प्रतिनिधी पूनमताई पवार यांच्याकडे काही समाजाच्या मागण्याचा आग्रह त्यांनी धरला आहे सौ.पवार बोलताना पुढे म्हणाल्या की,डॉक्टर अण्णा भाऊ साठे,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराज या महापुरुषांनी समाजासाठी आपले पूर्ण आयुष्य खर्ची घातले तेव्हा आपणही हा इतिहास पुढे न्यावा आपल्या विकासाबाबत आमदार राजेश पवार हे कटिबद्ध आहेत असेही त्या म्हणाल्या. यावेळी रामदास कांबळे, दत्ता पाटील मोरे, संभाजी पाटील मोरे, गंगाधर गायकवाड, पांडुरंग मोरे, अविनाश गायकवाड,भीमराव गायकवाड,माजी सरपंच संभाजी गायकवाड, बाबुराव शेरे आदी महिला पुरुष उपस्थित होते.सूत्रसंचालन माधव गायकवाड यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी साठी जयंती मंडळ पदाधिकारी मारुती रोडे संतोष रोडे दत्ता रोडे सुभाष रोडे धोंडीबा वाघमारे विठ्ठल रोडे आशिष रोडे गोविंद रोडे अंकुश रोडे माधव रोडे,विठ्ठल माधव रोडे यांनी परिश्रम घेतले आहे.

**... आपले विचार व्यक्त करून कार्यक्रमातून जात असताना मुद्दामहून उपस्थित महिलांमध्ये जाऊन खाली बसत हे मला खूप आवडते त्यात मी समाधान मानते असा मनाचा मोठेपणा सौ.पुनमताई पवार यांनी दाखवले**

दैनिक लोकनेता
संपादक: ज्ञानेश्वर मुंडे



Good Morning

# माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांच्या मातोश्री रंजनाबाई देशमुख यांचे निधन



लोकनेता न्यूज नेटवर्क
**बीड विजय रोडे**

परळी : परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथ देशमुख यांच्या मातोश्री श्रीमती रंजनाबाई रंगनाथराव देशमुख यांचे 87 वर्षी आज, गुरुवार दि. २७ ऑगस्ट २०२६ रोजी थोड्यावेळापूर्वी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले दोन मुली सुनो नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. निधनाने देशमुख कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

श्रीमती रंजनाबाई रंगनाथराव देशमुख या प्रेमळ, मनमिळावू व धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांच्या निधनाने देशमुख परिवाराची मोठी हानी झाली आहे.त्यांच्यावर शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता परळी वैजनाथ येथील देशमुख स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

देशमुख कुटुंबीयांच्या दुःखात आमचे दैनिक लोकनेता परिवार सहभागी आहे.

भावपूर्ण श्रद्धांजली!

## नगरसेविका सारिका डोरलीकर यांच्या पाठपुराव्याला यश; गडचांदूर प्रभाग क्रमांक 2 मध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन



*कॉंक्रिट रस्ते, नाली बांधकाम, गट्टू बसविणे, स्वच्छता अभियानासह वृक्षारोपणाला प्राधान्य; प्रभागाचा चेहरामोहरा बदलण्याचा नगरसेविकेचा निर्धार*

दैनिक लोकनेता न्यूज नेटवर्क
**चंद्रपुर/सिद्धेश्वर केंद्रे**

गडचांदूर नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक २ मध्ये विविध विकासकामांना आता गती मिळाली असून, नगरसेविका सारिका नितीन डोरलीकर यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे विविध विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. या विकासकामांमुळे प्रभागातील नागरिकांच्या अनेक वर्षांपासूनच्या समस्या मार्गी लागण्याची अपेक्षा असून, नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.
प्रभाग क्रमांक २ मधील साई मंदिर परिसरात कॉंक्रिट रस्त्याचे बांधकाम, नाली बांधकाम, रस्त्याच्या दुतर्फा गट्टू बसविणे, स्वच्छता अभियान राबविणे, तसेच हॉटेल ग्रीनपार्कच्या मागील भागात कॉंक्रिट रस्ता व नाली बांधकाम अशा विविध कामांचा यामध्ये समावेश आहे. याशिवाय प्रभागात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून पर्यावरणाचा समतोल राखण्यावरही भर देण्यात येणार आहे.
या विविध विकासकामांचे भूमिपूजन नगरसेविका सारिका नितीन डोरलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी प्रभागातील नागरिकांना आगामी पाच वर्षांच्या कालावधीत प्रभाग क्रमांक २ चा चेहरामोहरा बदलून दाखविण्याचा निर्धार व्यक्त केला. रस्ते, नाल्या, स्वच्छता, पर्यावरण तसेच मूलभूत सुविधांना प्राधान्य देऊन प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.
नागरिकांच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य
प्रभागातील रस्त्यांची अवस्था, पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पाण्याच्या समस्यांसह नाली व्यवस्थेचा प्रश्न आणि स्वच्छतेच्या समस्या दूर करण्यासाठी विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. कॉंक्रिट रस्ते व नाल्यांच्या बांधकामामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. रस्त्याच्या कडेला गट्टू बसविण्यामुळे परिसराचे सौंदर्य वाढण्यासोबतच नागरिकांच्या सोयीसाठीही मदत होणार आहे.
तसेच स्वच्छ व सुंदर प्रभाग निर्माण करण्याच्या उद्देशाने स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. विकासासोबतच पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी वृक्षारोपणाचा उपक्रमही राबविण्यात येणार असल्याने प्रभागाच्या विकासाला पर्यावरणपूरक दिशा मिळणार आहे.
भूमिपूजन सोहळ्याला मान्यवरांची उपस्थिती
भूमिपूजन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गडचांदूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष निलेशजी ताजने होते. यावेळी बांधकाम सभापती रामसेवक मोरे, आरोग्य सभापती तुषार बावणे, नगरसेवक महेश आवारी, नगरसेविका अश्विनी ताई कांबळे, शहर विकास आघाडीचे संदीपभाऊ शेरकी, प्रभाकरजी शेरकी, नथूजी हुलके गुरुजी, वाजीद शेख सर, नितीन डोरलीकर, राजेश बोगावार, गुंडावार गुरुजी, बबन सोनवणे, भारत टाकसांडे यांच्यासह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
विकासकामांच्या भूमिपूजनामुळे प्रभागातील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, मंजूर झालेली कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. आगामी काळात प्रभाग क्रमांक २ मध्ये आणखी विकासकामे मार्गी लावण्यासाठी नगरसेविका सारिका डोरलीकर यांचा पाठपुरावा सुरू राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## 23 ते 25 टक्के कमी दरातील कामांवरून दिग्रस नगर परिषदेत खळबळ; गुणवत्तेचा बोजवारा तर निघणार नाही ना?

### ३१ ऑगस्टच्या स्थायी समिती सभेत प्रशासनाला जाब विचारण्याची नागरिकांची अपेक्षा




दैनिक लोकनेता न्यूज नेटवर्क
**शफिक देशमुख दिग्रस**

दिग्रस नगर परिषदेमधील काही विकासकामांच्या निविदा अंदाजित दरापेक्षा तब्बल २३ ते २५ टक्के कमी दराने भरल्या गेल्याची चर्चा सुरू असून, या कमी दरात कंत्राटदार कामाचा दर्जा कायम कसा राखणार, असा थेट सवाल आता दिग्रसकरांकडून उपस्थित केला जात आहे. जनतेच्या पैशातून होणाऱ्या विकासकामांमध्ये गुणवत्ता ढासळल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्नही नागरिक विचारत आहेत.

बांधकाम साहित्याचे वाढते दर, मजुरी, वाहतूक, यंत्रसामग्रीचा खर्च यासोबतच GST व अन्य कर-कपातींचा भार लक्षात घेता इतक्या मोठ्या प्रमाणात कमी दराने काम स्वीकारण्यामागील गणित काय, याची चर्चा नगर परिषद वर्तुळात सुरू आहे. कमी दराची निविदा स्वीकारली म्हणजे काम निकृष्टच होईल, असे निश्चितपणे म्हणता येत नसले तरी कमी दरामुळे गुणवत्तेवर कोणताही परिणाम होणार नाही, याची खात्री प्रशासनाने करणे अत्यावश्यक आहे.

त्यासाठी निविदेतील BOQ, तांत्रिक specifications, वापरण्यात येणाऱ्या साहित्याची गुणवत्ता, मोजमाप पुस्तिका, गुणवत्ता चाचण्या, प्रत्यक्ष कामाची पाहणी तसेच देयकांमधील कपाती यांची काटेकोर तपासणी होणे गरजेचे आहे. केवळ कागदोपत्री तपासणी न करता प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन गुणवत्ता तपासली जाणार का, हा मुद्दाही महत्त्वाचा ठरत आहे.

३१ ऑगस्टच्या सभेत नेमके काय होणार?
३१ ऑगस्ट २०२६ रोजी होणाऱ्या नगर परिषद स्थायी समितीच्या सभेकडे आता दिग्रसकरांचे लक्ष लागले आहे. कमी दरातील निविदा, कामांचे तांत्रिक निकष, कंत्राटदारांची जबाबदारी आणि गुणवत्तेची हमी यावर सभेत ठोस चर्चा होणार का, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.
"कमी दरात काम मिळाले म्हणून जनतेच्या पैशातून होणाऱ्या कामाच्या गुणवत्तेशी तडजोड होता कामा नये. स्वस्त काम नव्हे, तर टिकाऊ आणि दर्जेदार काम हवे," अशी स्पष्ट भूमिका नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

स्थायी समितीच्या अध्यक्षा व सदस्य या गंभीर मुद्द्यावर कोणती भूमिका घेतात, प्रशासनाकडून काय स्पष्टीकरण दिले जाते आणि ३१ ऑगस्टच्या सभेत यावर नेमका कोणता निर्णय होतो, याकडे आता संपूर्ण दिग्रसचे लक्ष लागले आहे.

# ईद-ए-मिलादुन्नबीनिमित्त स्टॉलवर खाऊ पदार्थांचे वाटप

लोकनेता न्यूज नेटवर्क
**चंद्रपुर/ सिद्धेश्वर केंद्रे**

ईद-ए-मिलादुन्नबीच्या पवित्र पर्वानिमित्त गडचांदूर शहरात धार्मिक उत्साहासोबतच सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम राबविण्यात आले. याच अनुषंगाने शहरातील एका स्टॉलवर नागरिकांसाठी विविध खाऊ पदार्थांची व्यवस्था करून त्यांचे प्रेमपूर्वक वाटप करण्यात आले. या उपक्रमातून सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.
ईद-ए-मिलादुन्नबी हा मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र व महत्त्वाचा दिवस मानला जातो. पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस श्रद्धा व उत्साहाने साजरा केला




जातो. त्यांच्या जीवनातील प्रेम, दया, शांतता, बंधुभाव आणि मानवतेच्या विचारांचा संदेश समाजात पोहोचविण्याच्या उद्देशाने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. गडचांदूर शहरातील स्टॉलवर नागरिकांसाठी विविध खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्यात आली होती. स्टॉलवर आलेल्या नागरिकांना तसेच परिसरातील नागरिकांना खाऊ पदार्थांचे वाटप करण्यात आले.
लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत अनेक नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. यावेळी नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.
या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. धार्मिक सण केवळ एका समाजापुरता मर्यादित न राहता त्यातून प्रेम, आपुलकी आणि सामाजिक ऐक्याचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. ईदच्या आनंदात सर्वांना सहभागी करून घेण्याचा हा प्रयत्न असल्याने परिसरात या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.
यावेळी अफरोज शेख, अबरार शेख, तबरेज शेख, आबिद अली, रियान शेख, आदिल शेख, वाशिम कुरैशी, अलीम शेख, इकराम शेख, मोहम्मद शान, समीर शेख, समीर अली, तौफीक शेख, साद शेख, समीर अंसारी यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. "ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने प्रेम, बंधुभाव, शांतता आणि मानवतेचा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचावा. समाजातील सर्व घटकांनी एकोप्याने व परस्पर स्नेहाने राहावे, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे," असे आयोजकांनी सांगितले.
या उपक्रमामुळे ईद-ए-मिलादुन्नबीचा आनंद नागरिकांसोबत वाटून घेत सामाजिक सलोखा व एकतेचा संदेश देण्यात आला.


# पशुपालकांच्या ऑनलाइन प्रशिक्षणानंतर प्रमाणपत्र वाटपाचा मुद्दा चर्चेत; प्रशिक्षणाला महत्त्व की श्रेयवादाला?

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**औसा |महेश कोळी**

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकतेअंतर्गत पशुपालकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाइन प्रशिक्षणाच्या पार्श्वभूमीवर आता प्रमाणपत्र वाटपावरून वेगळीच चर्चा रंगू लागली आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार असल्याचे स्पष्ट असतानाही, काही ठिकाणी 'जिल्हा परिषद सदस्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप झाले पाहिजे' असा अट्टाहास होत असल्याची चर्चा पशुपालकांमध्ये सुरू आहे. पशुपालकांना पशुधन व्यवसाय, उद्योजकता आणि आधुनिक पशुपालनाबाबत मार्गदर्शन मिळावे, हा प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. मात्र प्रशिक्षणाच्या मूळ उद्देशापेक्षा प्रमाणपत्र वाटपाला आणि त्याच्या श्रेयाला अधिक महत्त्व दिले जात असल्यास हा प्रकार कितपत योग्य, असा सवाल उपस्थित होत आहे.ऑनलाइन प्रशिक्षणासाठी लिंक व्हॉट्सअॅप ग्रुपवर शेअर करून पशुपालकांनी वेळेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले होते. मोबाईल




वापरण्यात अडचण असलेल्या पशुपालकांना इतरांनी सहकार्य करण्याचेही सांगण्यात आले आहे. त्यामुळे प्रशिक्षणाचा लाभ जास्तीत जास्त पशुपालकांपर्यंत पोहोचविण्यात आला. अनेकांनी अनेक अडचणींवर मात करीत प्रशिक्षण पुर्ण केले परंतु आता अधिकाऱ्यांची प्रमाणपत्र देण्यासाठी जाणिव पुर्वक टाळाटाळ करत असल्याचे बोलले जात आहे.याबद्दल तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ लसणे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की आम्ही प्रमाणपत्र वाटप करण्यासाठी सांगितले आहे.आता काही




कार्यक्रम ची आवश्यकता नाही

--------

**प्रशिक्षणाचा लाभ महत्त्वाचा की प्रमाणपत्र वाटपाचा सोहळा?**

पशुपालकांना प्रत्यक्ष उपयोगी ज्ञान आणि मार्गदर्शन मिळणे हा प्रशिक्षणाचा केंद्रबिंदू असताना, त्याला राजकीय श्रेयवादाची किनार येऊ नये, अशी अपेक्षा पशुपालकांकडून व्यक्त होत आहे. प्रमाणपत्र मिळाले नाही तरी प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान पशुपालकांच्या व्यवसायासाठी उपयोगी ठरणार आहे. त्यामुळे केवळ 'कोणाच्या हस्ते वाटप झाले' यापेक्षा पशुपालकांना प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष फायदा झाला का, याला प्राधान्य द्यावे, अशी भावना व्यक्त होत आहे.

> **प्रमाणपत्र वाटपासाठी 'जि. प. सदस्यांच्या हस्ते'चा अट्टाहास!**
> आम्हाला जि प सदस्य यांनी सांगितले आहे की बेलकुंड पशुवैद्यकीय दवाखाना अंतर्गत प्रशिक्षण पुर्ण केलेल्या पशुपालकांना प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप करण्यासाठी कार्यक्रम घेऊन करू असे सांगितले आहे.त्यामुळे आम्ही वाटप करत नाही
> पुजा कदम
> पशू वैद्यकीय अधिकारी बेलकुंड

# दिगाव येथे हनुमंतराय भंडारा निमित्त अखंड हरिनाम सप्ताह




## 42 वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह परंपरा

लोकनेता न्यूज नेटवर्क
**कन्नड मुजीब खान**

छत्रपती संभाजीनगर: कन्नड तालुक्यातील पैलवानांचे गाव अशी संपूर्ण महाराष्ट्रात ओळख असलेल्या दिगाव येथे गेल्या ४२ वर्षापासून चालू असलेला अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दिगाव गावकरी मंडळीं यांच्या आयोजित करण्यात आला आहे. प्रेरणास्थान-ह भ प.देविदास महाराज कन्नड, ह भ प रमेश महाराज, यांच्या मार्गदर्शनाखाली व समस्त गावकरी मंडळी यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेला आहे.कीर्तनकार ह .भ. प .रमेश महाराज पवार दिगाव,ह भ प बजरंग महाराज,ह भ प बाळू महाराज,ह भ प ज्ञानेश्वर महाराज हावळे,ह भ प. वृषप्रिया ताई महाराज,ह भ प पारस महाराज,ह भ प महाजन महाराज व ह भ प दत्तू महाराज तुपे यांच्या कालीच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होईल. सप्ताहातील अन्नदाते=1धनजी रामराव सुसुंद्रे , विलास कौतिक दिवटे , वाळूबा बर्डे, साहेबराव सुसुंद्रे , हरिभाऊ कबाडे ,नितीन देवकर, सोनजी आगळे, भागवत कबाडे सह इत्यादी बांधवांनी अन्नदान साठी पुढाकार घेतला आहे.
या कार्यक्रमासाठी समस्त गावकरी मंडळी दिगाव यांचे सहकार्य लाभले.
दि.29/08/2026
वार शनिवार या दिवशी भंडारा व महाप्रसादाचा कार्यक्रम राहील. सर्व पंच कृषीतील भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

# मतदारांनो प्रारूप मतदार यादी तपासा !

## रामदास पाटील सुमठाणकर यांचे आव्हान

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नांदेड जिल्हा प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर**

राज्यात राबविण्यात आलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेर तपासणी एसआयआर मोहिमेचा घरोघरी जाऊन मतदाराकडून गणना प्रपत्र भरून घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना तसेच मतदार यांचे येणारे अक्षेय 31 ऑगस्ट ते 30 सप्टेंबर शिवकारण्यात येणार असून सर्व नागरिकांनी यादी तपासून घ्यावे. असे आवाहन रामदास पाटील सुमठाणकर यांच्या वतीने करण्यात आली आहे.

दरम्यान ही यादी तहसील कार्यालय येथे प्रसिद्ध होणार आहे संबंधित एजंटकडे यादी लक्षपूर्वक तपासावे असेही सांगितले.

महाराष्ट्रातील अख्ख्या याद्यांची प्रारूप मतदार यादी 31 ऑगस्ट 2026 रोजी प्रसिद्ध होणार आहे सुधारित वेळापत्रकानुसार 31 ऑगस्ट ते 30 सप्टेंबर 2026 या काळात दावी
दावे व हरकती दाखल करता येतील त्यानंतर त्यांची सुनावणी/
निराकरण 22 ऑक्टोबर पर्यंत होईल आणि अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार आहे.

अधिक माहिती देताना रामदास पाटील सुमठाणकर यांनी सांगितले की, नागरिकांनी 31 ऑगस्टला यादी आल्यावर काय करायचे? नावाची स्पेलिंग बरोबर आहे का? वय/जन्मतारीख, फोटो, पत्ता योग्य आहे का? मतदार क्रमांक ( EPIC) आणि मतदान केंद्र योग्य आहे का?
*सर्वात महत्त्वाचे*
31 ऑगस्टला यादी पाहिल्यानंतर नाव नसल्यास आता काही करता येणार नाही अशी अजिबात नाही. उलट्या दिवसापासून दावा दाखल करण्यासाठी महत्त्वाचा कालावधी सुरू होतो.
नाव गायब असेल तर घाबरू नका प्रारूप यादी म्हणजे अंतिम यादी नाही. नाव वगैरे



गेले असल्यास 31 ऑगस्ट 29 ऑक्टोबर या कालावधीत दावा करून नाव समाविष्ट करण्याची संधी आहे. नाव चुकीचे असल्यास दुरुस्ती मागता येईल. नाव, पत्ता, वय, फोटो इत्यादी मध्ये सुट्टी असल्यास त्यासाठी दावा/ हरकत दाखल करता येते.

तुमच्या कुटुंबातील तसेच प्रत्येक मतदाराचे नाव स्वतंत्रपणे तपासा. विशेषता वृद्ध व्यक्ती, स्थलांतरित सदस्य किंवा ज्यांचे नाव यादीमध्ये पडताळणी केले नाही अशांची नावे काळजीपूर्वक तपासा. जर 2025 च्या मतदार यादीत नाव होते पण 2026 च्या डखठ मध्ये पडताळणी गेले नाही अशांची नावे काळजीपूर्वक तपासा. जर 2025 च्या मतदार यादीत नाव होते पण 2026 च्या ऋषी मध्ये नाही तर महाराष्ट्र चेंज च्या डखड पोर्टलवर अशा मतदारांसाठी स्वतंत्र डऊऊ (ABsent/Shifted/Dead/Duplicate) तपासणीची सुविधाही उपलब्ध आहे. जिल्ह्यातील व प्रामुख्याने 90-देगलूर बिलोली मतदार संघातील सर्व नागरिकांनी काळजीपूर्वक नाव तपासून खात्री करावे जेणेकरून मतदानापासून वंचित राहणार नाही अशी ही सांगितले.

# पावसाचा खंड; बाजारपेठेत 75 टक्के उलाढालीवर परिणाम

## देगलूर बाजारपेठेतील स्थिती; शेतकरी, व्यापाऱ्यांना प्रतीक्षा

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नांदेड जिल्हा प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर**

खरीप हंगामातील फेकी बहरात असतानाच ऑगस्ट महिन्यात पावसाने मोठा खंड दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. कापूस, सोयाबीन, तूर, हळद , आदी पिके सध्या तग धरून असली तरी कडकउन्हामुळे पिके सुकू लागली आहेत. हॉटेल चार-पाच दिवसात दमदार पाऊस न झाल्यास पिके जळून जाण्याची भीती शेतकऱ्याकडून व्यक्त होत आहे. पावसाचा या दाढीचा थेट परिणाम देगलूर शहराच्या बाजारपेठेवरही झाला असून आर्थिक उलाढाल मंदावली आहे.

देगलूर तालुक्यात सिंचनाच्या सुविधा अपुऱ्या असल्याने खरीप हंगामातील पिकावरच शेतकऱ्यांची मोठी मदार आहे. यंदा मान्सून उशिराने दाखल झाल्याने खरीप पिकांचे पेरण्या जुलै महिन्यात झाल्या.
त्यानंतर अधून मधून झालेल्या मध्यम स्वरूपाच्या पावसामुळे पिकांना काहीच आधार मिळाला.
मात्र, ऑगस्ट महिन्यात अद्याप दमदार पाऊस झालेला नाही.
31 जुलै रोजी झालेल्या पावसाच्या ओलाव्यावर कापूस, सोयाबीन, थोर आणि हळद आधी पिके तर धरून आहेत.
मात्र, दिवसा वाढणारे खडकवून आणि जमिनीतील कमी ओलावा यामुळे पिकांची अवस्था नाजूक बनली आहे.

-----------------------------------------

*पावसाअभावी बाजारपेठेतही मंदी*
*शेतकऱ्यांच्या अडचणीचे* पडसाद आता देगलूरच्या बाजारपेठेतही उमटू लागले आहेत. शहरातील प्रमुख बाजारपेठामध्ये ग्राहकांची वर्दळ कमी झाली असून अनेक दुकानदारांमध्ये दिवसभर शुकशुकाट दिसत आहे.
*शेतीच्या उत्पन्नावर*मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या बाजारपेठेतील आर्थिक उलाढाल मंदावली आहे. येत्या काळात पोळा, गणेशोत्सव, महालक्ष्मी आधी सण असतानाही बाजारपेठेत अपेक्षित उत्साह दिसून येत नाही.
*अनेक व्यापाऱ्यांना*दिवसभर दुकानात बसूनही दररोजचा खर्च भागविणे कठीण झाले आहे. इकडे शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत. तर दुसरीकडे व्यापारी ग्राहकांच्या प्रतीक्षेत असल्याचे चित्र आहे.

-----------------------------------------

खरीप पिकांसाठी शेतकऱ्यांनी बियाणे, रासायनिक खते, फवारणी, खुरपणी आदीवर मोठा खर्च केला आहे. जून



महिन्यापासूनच दमदार पाऊस न झाल्याने जमिनीतील पाणी पातळीत अपेक्षित वाढ झालेली नाही. त्यामुळे व्हेरी आणि बोरवेललाही जेमतेम पाणी आहे. काही शेतकरी उपलब्ध पाण्यातून पिके पाचवीच्या प्रयत्न करीत आहेत.

-----------------------------------------

पाऊस नसल्यामुळे ग्राहक बाजारपेठेत येत नाहीत. अत्यंत गरजेच्या वस्तू खरेदी करण्यासाठीच ग्राहक दुकानात येत आहेत. त्यामुळे बाजारपेठेत चिंतेचे वातावरण आहे. तर रोजचा दुकान खर्च निघणे हे सध्या अवघड झाले आहे.
*विजय अनुप वस्त्रालय अध्यक्ष कापड असोसिएशन अविनाश कोडगिरे देगलूर*
जीवनावश्यक वस्तूंचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. त्यातच पाऊस नसल्याने शेतकरी आणि व्यापारी दोघेही हवाले झाले आहेत. श्रावण महिन्यात किराणा वस्तूंची विक्री वाढते ; मात्र यंदा दरवाढ आणि पावसाच्या अभावामुळे अपेक्षेच्या केवळ 25 टक्केच खरेदी होत आहे.
**दिलीप बच्चेवार किराणा व्यापारी देगलूर**

## न्यायासाठी 13 दिवसांपासून राहत्या घरी उपोषण; श्रीगोंदा तहसील प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह




**लोकनेता न्यूज नेटवर्क**
श्रीगोंदा | प्रतिनिधी

श्रीगोंदा तालुक्यातील वडाळी येथील गट क्रमांक २७८ संदर्भातील RTS केस क्र. ०६/२०२४ हे प्रकरण २०२४ पासून प्रलंबित असल्याचा आरोप करत संबंधित पक्षकारांनी तहसील प्रशासनाच्या कारभाराविरोधात नाराजी व्यक्त केली आहे. वारंवार सुनावणीच्या तारखांना हजेरी लावूनही प्रकरणाचा निकाल लागत नसल्याने अखेर १४ ऑगस्ट २०२६ पासून संबंधितांनी आपल्या राहत्या घरीच आमरण उपोषण सुरू केले आहे.

तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, श्रीगोंदा यांच्या कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या सुनावणी नोटीसमध्ये वडाळी येथील गट क्र. २७८ मधील क्षेत्राबाबत चौकशीचा उल्लेख आहे. संबंधितांना सुनावणीसाठी तहसील कार्यालयात हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले होते.

मात्र, सुनावणीच्या तारखेला संबंधित प्रतिवादी उपस्थित राहत नसल्याने प्रकरण वारंवार पुढे ढकलले जात असल्याचा आरोप उपोषणकर्त्यांकडून करण्यात येत आहे. या प्रकरणासाठी तहसील कार्यालयात वारंवार हेलपाटे मारावे लागले असून, यापूर्वीही उपोषण करून दखल घेण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

त्यामुळे न्याय मिळावा आणि २०२४ पासून प्रलंबित असलेल्या RTS प्रकरणाचा तातडीने निपटारा करावा, या मागणीसाठी १४ ऑगस्टपासून आपल्या राहत्या घरीच आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. उपोषण सुरू होऊन अनेक दिवस उलटूनही तहसील प्रशासनाकडून पुरेशी दखल घेतली जात नसल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे.

राहत्या घरी सुरू असलेल्या या उपोषणामुळे प्रशासनाने तातडीने दखल घेऊन प्रकरणाची सुनावणी पूर्ण करावी आणि संबंधितांना न्याय द्यावा, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, २०२४ पासून प्रलंबित RTS प्रकरणाचा तातडीने निकाल लागणार का आणि राहत्या घरी सुरू असलेल्या आमरण उपोषणाची तहसील प्रशासन कधी दखल घेणार, याकडे वडाळी ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. तहसील प्रशासनाची अधिकृत भूमिका समोर आल्यानंतरच या प्रकरणातील पुढील चित्र स्पष्ट होणार आहे.

## ऑपरेटरअभावी श्रीगोंदा सरकारी रुग्णालयातील एक्स-रे मशीन बंद; नागरिकांची गैरसोय

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
**श्रीगोंदा | प्रतिनिधी**

श्रीगोंदा : - येथील शासकीय रुग्णालयातील एक्स-रे मशीन ऑपरेटरअभावी बंद असल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची मोठी गैरसोय होत आहे. उपचारासाठी शासकीय रुग्णालयात येणाऱ्या नागरिकांना एक्स-रेसाठी खासगी केंद्रांचा आधार घ्यावा लागत असल्याने आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यामुळे रुग्णालयातील एक्स-रे सेवा तातडीने सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.
श्रीगोंदा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक नागरिक उपचारासाठी शासकीय रुग्णालयावर अवलंबून आहेत. अपघात, हाडांच्या दुखापती, फ्रॅक्चर तसेच विविध आजारांच्या निदानासाठी डॉक्टरांकडून एक्स-रे करण्याचा सल्ला दिला जातो. मात्र रुग्णालयात एक्स-रे मशीन उपलब्ध असूनही ते चालविण्यासाठी आवश्यक ऑपरेटर उपलब्ध नसल्याने सेवा बंद असल्याचे चित्र आहे.




शासकीय रुग्णालयात अत्यल्प खर्चात किंवा शासनाच्या नियमानुसार मोफत उपचार मिळतील, या अपेक्षेने गरीब व सर्वसामान्य नागरिक येथे येतात. मात्र एक्स-रे सेवा बंद असल्याने रुग्णांना बाहेरील खासगी केंद्रात जावे लागत आहे. त्यामुळे तपासणीसाठी अतिरिक्त पैसे खर्च करण्याबरोबरच वेळही वाया जात आहे. विशेषतः ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. रुग्णालयात आवश्यक यंत्रणा उपलब्ध असताना केवळ ऑपरेटरअभावी एक्स-रे सेवा बंद राहणे ही गंभीर बाब असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. आरोग्य विभागाने तातडीने याची दखल घेऊन प्रशिक्षित ऑपरेटरची नियुक्ती किंवा पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.
दरम्यान, एक्स-रे सेवा किती दिवसांपासून बंद आहे, ऑपरेटरची जागा रिक्त का आहे आणि सेवा पूर्ववत करण्यासाठी आरोग्य विभागाने कोणती कार्यवाही केली आहे, याबाबत प्रशासनाने स्पष्ट माहिती देण्याची मागणीही नागरिकांनी केली आहे.
शासकीय आरोग्य व्यवस्थेवर सामान्य नागरिकांचा मोठा विश्वास असताना मूलभूत निदान सेवा उपलब्ध न राहणे ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून एक्स-रे मशीन सुरू करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध

## शेवगावात मनसे विद्यार्थी सेनेचा झंझावात!महाविद्यालय परिसरात महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेची मोठ्या प्रमाणात सदस्य नोंदणी; तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लोकनेता न्यूज नेटवर्क | बाळासाहेब खेडकर, पाथर्डी प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली व महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमितसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी सेनेच्या वतीने सुरू असलेल्या सदस्य नोंदणी अभियानाला शेवगावमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, महाविद्यालय परिसरात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व तरुणांनी विद्यार्थी सेनेचे सदस्यत्व स्वीकारले.
अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड यांच्या पुढाकारातून जिल्ह्यात विद्यार्थी व तरुणांमध्ये संपर्क वाढवून सदस्य नोंदणीचे अभियान राबविण्यात येत आहे. पाथर्डीनंतर आता शेवगावमध्येही या अभियानाला चांगला प्रतिसाद मिळत असून, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये मनसे विद्यार्थी सेनेबद्दल आकर्षण निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.
शेवगाव तालुका अध्यक्ष अजिंक्य अंधारे, तालुका उपाध्यक्ष सलमान इनामदार आणि सचिव प्रतिक मिलिंद रंधावणे यांच्या नेतृत्वाखाली सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात आले.
यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत संघटनेच्या माध्यमातून विद्यार्थी व तरुणांच्या प्रश्नांसाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.
या अभियानात पाथर्डी तालुका अध्यक्ष ओम



देविदास खेडकर, तालुका उपाध्यक्ष भागवत महादेव रोमन यांच्यासह रामेश्वर बलिया, माऊली कुसळकर, अमीन सय्यद, ज्ञानेश्वर घुले, प्रवीण घुले, अतुल अनिल चक्रनारायण, प्रसाद लिंगे, कृष्णा गंगाधर घुले, ज्ञानेश्वर चंद्रकांत बनसोडे, अभिनंदन विष्णू भूंबर, ओंकार डेंगळे आणि गोपाळ मोरे आदी उपस्थित होते.
महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना संघटित व्यासपीठ मिळावे, विद्यार्थ्यांच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचवाव्यात तसेच तरुणाईला सामाजिक व संघटनात्मक कार्याची दिशा मिळावी, या उद्देशाने सदस्य नोंदणी अभियानाला वेग देण्यात आला आहे.
पाथर्डीनंतर शेवगावमध्येही मनसे विद्यार्थी सेनेच्या सदस्य नोंदणी अभियानाने जोर धरल्याने तरुणाईमध्ये संघटनेची नव्याने क्रेझ निर्माण होत असल्याचे चित्र दिसून आले.

# हणेगावातील देशी दारू दुकानांतून रात्री ‘पार्सल’ चौकशीची मागणी

## काळ्या वाहनासह तीनचाकी वाहनातून दारू वाहतूक होत असल्याचा तक्रारीत दावा; स्टॉक रजिस्टर, सीसीटीव्ही व विक्री नोंदी तपासण्याची मागणी

**लोकनेता न्युज नेटवर्क**
**नांदेड जिल्हा प्रतिनिधी/ संतोष चिद्रावार लोणीकर**

हणेगाव येथील परवानाधारक देशी दारू दुकानांमधून रात्री तसेच पहाटेच्या वेळी दारूचे ‘पार्सल’ करून परिसरातील गावांमध्ये वाहतूक केली जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे परवानाधारक दुकानांच्या आडून नियमबाह्य विक्री व वाहतूक सुरू आहे हणेगाव येथील रवी हिंदीखेरे यांनी नांदेड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक निलाभ रोहन यांच्यासह संबंधित प्रशासनाकडे निवेदन देऊन या संपूर्ण प्रकाराची निष्पक्ष, गोपनीय आणि सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.
निवेदनानुसार, हणेगाव-शिळवणी रोडवरील देशी दारू दुकानातून रात्रीच्या वेळी चार चाकी वाहनाद्वारे दारू बाहेर नेली जात असल्याचे तक्रारदाराच्या निदर्शनास आले आहे. तसेच हणेगाव-देगलूर रोडवरील दुसऱ्या देशी दारू दुकानातून तीनचाकी वाहनाद्वारे रात्री दारूची वाहतूक होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.
या कथित वाहतुकीचा संबंध लोणी, मरखेल, भूतनहिप्परगा, बेंबरा, मानूर, येडूर, कुमारपल्ली, बिजलवाडी, शिळवणी तसेच परिसरातील तांड्यांपर्यंत आहे का, याची फक्त कागदोपत्री नव्हे तर प्रत्यक्ष पातळीवर तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**स्टॉक रजिस्टर तपासा; सीसीटीव्ही फुटेजचीही छाननी करा**

दोन्ही देशी दारू दुकानांचे स्टॉक रजिस्टर, विक्री नोंदी, बिलांची नोंद आणि उपलब्ध सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात यावे. विशेषतः रात्रीच्या वेळेतील दुकानातील व दुकानाबाहेरील हालचालींची छाननी करून दारू नेमकी कुठे आणि कोणामार्फत जात आहे, याचा तपास करावा, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.
दारू वाहतुकीसाठी वापरल्या जात असल्याचा आरोप असलेल्या चार चाकी वाहनाची तसेच तीनचाकी वाहनाचीही चौकशी करून त्यांचा कथित दारू वाहतुकीशी संबंध आहे का, हे तपासावे, असे निवेदनात म्हटले आहे.

**परवान्याच्या अटींचे उल्लंघन होतेय का?**

परवानाधारक दुकानांना ठरवून दिलेल्या नियम व अटींचे पालन प्रत्यक्षात होत आहे की नाही, याची दारूबंदी विभागाने स्वतंत्र तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. परिसरातील गावांमध्ये अवैध दारू वाहतूक अथवा ‘पार्सल’ विक्री सुरू आहे का, याची गोपनीय चौकशी करून संपूर्ण साखळी समोर आणावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**दोषी आढळल्यास कारवाईचा बडगा उगारण्याची मागणी**

चौकशीत तक्रारीतील आरोप तथ्यात्मकदृष्ट्या खरे आढळल्यास संबंधित व्यक्ती, वाहनचालक तसेच दुकानदारांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चौकशी कोणत्याही दबावाखाली न करता निष्पक्षपणे करावी, अशी स्पष्ट भूमिका तक्रारदाराने घेतली आहे.
हे निवेदन कोणत्याही व्यक्तीविरुद्ध वैयक्तिक द्वेषातून नसून, स्वतःच्या निदर्शनास आलेल्या संशयास्पद हालचालींची प्रशासनाने अधिकृत चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, या उद्देशाने दिल्याचे रवी हिंदीखेरे यांनी स्पष्ट केले आहे.

### ‘पार्सल’चा आरोप खरा की केवळ संशय? आता पोलिसांच्या तपासाकडे लक्ष

दरम्यान, निवेदनातील आरोपांची सत्यता अधिकृत चौकशीतच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे मरखेल पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी हुंडेकर यांच्या नेतृत्वाखाली या तक्रारीची प्रत्यक्ष चौकशी होते का, रात्रीच्या कथित दारू वाहतुकीमागील सत्य बाहेर येते का आणि दोषी आढळल्यास संबंधितांवर कारवाईचा बडगा उगारला जातो का, याकडे हणेगावसह लोणी-मरखेल परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. परवानाधारक दुकानातूनच जर रात्रीच्या वेळी नियमबाह्य पद्धतीने दारू बाहेर जात असल्याचा संशय व्यक्त होत असेल, तर केवळ कागदोपत्री तपासणी न करता प्रत्यक्ष वाहन, सीसीटीव्ही, स्टॉक आणि विक्री नोंदी यांची सांगड घालून सत्य बाहेर काढणे आवश्यक आहे.

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)